**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्र.- ०२४६२-२३४५०४
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in

नियंत्रण कक्ष:- ०२४६२-२३४७२०
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड-४३१६०१

## पोलीस शिपाई भरती-२०२१-२२

## उमेदवारांसाठी सुचना

नांदेड जिल्हा पोलीस आस्थापनेवरील रिक्त असलेल्या १२८ पोलीस शिपाई व ६ बॅन्डस्मन पदासाठी दिनांक १९.०६.२०२४ ते ०४.०७.२०२४ या कालावधीत मैदानी चाचणी घेण्यात आली होती.

मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या पोलीस शिपाई १४६० उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक २५.०७.२०२४ व बॅन्डस्मन २२ उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०२.०८.२०२४ रोजी घेण्यात आली होती, त्यानंतर लेखी परिक्षामधील प्राप्त गुणांची यादी दिनांक २७.०७.२०२४ रोजी लावण्यात आली, बॅन्डस्मन लेखी परिक्षामधील प्राप्त गुणाची यादी दिनांक ०२.०८.२०२४ रोजी लावण्यात आली, तदनंतर उमेदवारांचे आक्षेप ग्राहय धरुन सुधारीत यादी दिनांक ०५.०८.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**शारीरिक मैदानी चाचणी व लेखी परिक्षेमधील उत्तीर्ण उमेदरांच्या एकत्रीत गुणांच्या आधारे जे उमेदवार पात्र झाले आहेत, त्या उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार तसेच सामाजीक व समांतर आरक्षणाच्या आधारे पोलीस शिपाई पदासाठी उमेदवारांची तात्पुरती निवड व प्रतींक्षा यादी तयार करण्यात आली आहे.**

सदरची तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी ही उमेदवारांचे माहितीकरीता पोलीस अधीक्षक, नांदेड येथील पोलीस कवायत मैदान आणि पोलीस अधीक्षक, कार्यालय वजीराबाद नांदेड येथील नोटीस बोर्डवर तसेच पोलीस अधीक्षक, नांदेड कार्यालयाचे संकेत स्थळावर https://nandedpolice.gov.in आणि मा. पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील संकतेस्थळ www.mahapolice.gov.in या वरही प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदरच्या तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादीमध्ये उमेदवारांना काही आक्षेप/हरकती असल्यास त्यांनी दि.१८.०८.२०२४ रोजीचे १००० वाजेपर्यन्त पोलीस अधीक्षक, कार्यालय, नांदेड यांचे ईमेल आयडी - sp.nanded@mahapolice.gov.in वर लेखी स्वरुपात उचीत कागदपत्रासह नोंदवावा. तदनंतर विहीत मुदतीनंतर प्राप्त होणा-या कोणत्याही आक्षेप/ हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.

**तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये नमुद उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन त्यांना नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे उमेदवारांनी समजू नये.**

तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांच्या विहीत कालावधीतील मुळ कागदपत्रांची व इतर Eligibility Criteria ची पडताळणी करण्यात येणार असून त्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांचाच अंतीम निवडसुचीमध्ये समावेश करण्यात येईल.याची उमेदवारानी नोंद घ्यावी.

**ठिकाण :- नांदेड**
**दिनांक :- १६.०८.२०२४**

(अबिनाश कुमार)
पोलीस अधीक्षक, नांदेड